**महाराष्ट्र विधानसभा**
**दुसरे अधिवेशन, २०२५**
**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**कपात सूचनांची एकूण संख्या - १०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ४२, रूपये:- १२,२५,१७,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१) | ७१८ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात कृषि विभागाच्या इमारती ह्या जिर्ण अवस्थेत असणे, कृषि विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनेक पदे रिक्त असणे, तसेच साकोली व लाखनी तालुक्यातील कृषि अधिकारी कार्यालयाअंतर्गत दोन मंडळ कृषि अधिकारी कार्यालय उपलब्ध नसणे, त्यामुळे शेतकरी हा कृषि विभागाच्या विविध योजनेपासून वंचित असणे, शेतकऱ्यांना कृषि विषयक प्रशिक्षण देण्याकरीता मेळाव्यांचे आयोजन न होणे, तसेच शेतक-यांना धनाचे बोनस व प्रोत्साहन राशी वेळेवर न मिळणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२) | ७७८ | १० | अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामूळे प्रशासकीय कामकाज करीत असतांना अनेक अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून नवीन विद्यापीठ स्थापन करण्यासाठी राज्य सरकारने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे डॉ. बी.व्यंकटेश्वरलू यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांचा समावेश असलेली समिती गठीत केली. या समितीने विदर्भातील चंद्रपूर, सिंदेवाही, मूल, नागपूर या ठिकाणी दौरा करून भौगोलीक परिस्थितीची पाहणी करून अनेक तज्ञांचा मत घेवून केलेल्या मूल्यांकनाचा अहवाल दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी शासनाकडे सादर केलेला असून त्यात अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे विभाजन नवीन विद्यापीठ स्थापन करावे असे मत सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे, तसेच मुल्यांकन समितीसह केळकर समितीने सिंदेवाही येथे नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करावे असे मत सादर केलेल्या अहवालात म्हटलेले असतांना सुध्दा डॉ.पंजाबराव देशमूख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून सिंदेवाही येथे नवीन विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३) | ७७९ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली या तालुक्यात ९९ टक्के धान उत्पादक शेतकरी व शेतमजूर वास्तवास आहेत. शेतकऱ्यासह त्यांच्या पाल्यांना शेती विषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, बारमाही उत्पादन घेऊन आर्थीक उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी कृषीतंज्ञाकडून मागदर्शन मिळण्याकरिता ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली येथे कृषीभवनाची मागणी लोकप्रतिनिधीनी केली असून त्याप्रमाणे लेखी वेदन सुध्दा दिले आहे. त्यामुळे या तीनही तालुक्याच्या ठिकाणी कृषीभवन बांधकाम करण्याचा अंदाजपत्रकासह रितसर प्रस्ताव जिल्हा कृषी अधिक्षक, कृषी विभाग चंद्रपूर यांनी अप्पर मुख्य सचिव कृषी विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. मात्र गेल्या दोन वर्षापासून सदर प्रस्ताव मंजूरी विना संबधित विभागाकडे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यात तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामुळे ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली येथील कृषीभवन बांधकाम करण्याच्या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मंजूरीमिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ४३, रूपये:- ५,६८,५०,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (४) | ७४८ | १० | सोलापूर जिल्ह्यातील ६१ हजार ४६० हेक्टर जमिनीवर डाळींब पिकाचे उत्पादन घेतले जाते राज्यात डाळींबाचा जिल्हा म्हणून सोलापूर जिल्ह्याची विशेष ओळख आहे, म्हणून सोलापूर जिल्ह्यात केंद्रीय डाळींब संशोधन केंद्र मंजूर करून २००५ पासून कार्यान्वित आहे, परंतु संशोधन केंद्रामध्ये आजतागायत डाळींबाचे नवीन वाण निर्माण करण्याबाबत अपयशी ठरलेले आहे, तरी केंद्रीय डाळींब संशोधन केंद्रात नवीन डाळींब वाण निर्मिती करण्यासाठी शासनाने बीज परीक्षण प्रयोगशाळा बळकटीकरण करण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**उप लेखाशीर्ष: ५०, इतर खर्च**<br>**बाब क्रमांक: ५०, रूपये:- ५,००,००,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (५) | ७२२ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात पशुवैद्यकिय दवाखान्याच्या स्वतंत्र ईमारती उपलब्ध नसणे, पशुवैद्यकिय व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, त्यामुळे जनावरांवर रोग प्रतिबंधक उपाययोजना करण्यास अडचण निर्माण होणे, पशुपालकांच्या दारात जनावरांना सखोल वैद्यकीय सेवा मिळावी आणि पशुपालकांमध्ये पशुसंवर्धनाबाबत जागरुकता वाढावी, जनावरांचे आजार ओळखावेत आणि लसीकरण व्हावे यासाठी गावपातळीवर पशु आरोग्य शिबिरांचे आयोजन न होणे, साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात अत्याधुनिक मत्स्य बिज केंद्र व प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नसणे, त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील मश्चिमार बांधव हे विविध योजनेंपासून वंचित असणे, तालुका स्तरावर शासकीय दुग्ध संकलन केंद्र |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उपलब्ध नसणे, त्यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होणे, त्यामुळे शासनाने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०४, दुग्धव्यवसाय विकास**<br>**बाब क्रमांक: ५५, रूपये:- ६६,४२,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (६) | ७५० | १० | राज्यातील शेतीसह दुध उत्पादन हा पुरक व्यवसाय येथील शेतकरी वर्षानुवर्षे करीत असून राज्यातील सहकारी दुध संघ तसेच खाजगी दुध प्रकल्पांना दुध पुरवठा, दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधासाठी देण्यात येणारे अनुदान हे अत्यंत अल्प असून, सदरचे अनुदान प्रती लिटर रूपये १० या प्रमाणे देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०५, मत्स्यव्यवसाय**<br>**बाब क्रमांक: ५८, रूपये:- १३,६३,९८,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (७) | ७३३ | १० | मढ, मालाड पश्चिम मुंबई येथील तळपशा बंदरावर मासळी साठवणूक व अन्य आवश्यक गरजांच्या अनुषंगाने सुविधांचा अभाव असणे, स्थानिक मच्छीमारांकडून विविध सुविधांच्या निर्मितीची सातत्याने मागणी केली जाणे, प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत विविध सुविधांची निर्मिती करण्याची गरज निर्माण झालेली असणे, तसेच बंदरावर मढ मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्था या एकाच मच्छीमार संस्थेच्या माध्यमातून विविध प्रक्रिया पार पडणे, अन्य स्थानिक ३ मच्छीमार संस्था देखील बंदरावर काम करण्यास इच्छुक असणे, मढ दर्यादिप मच्छीमार सहकारी संस्था, हरबादेवी मच्छीमार सहकारी संस्था, भाटी मच्छीमार सहकारी संस्था ह्या संस्थांनी देखील बंदरावर काम करु देण्याची मागणी केलेली असणे, अन्य तीन संस्थांना देखील बंदरावर काम करता यावे, चारही संस्थाना समान वाटप व्हावे यासाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ७५१ | १० | धनमंत्री मत्स्यसंपदा योजना ही राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या तर्फे चालवली जाणारी महत्त्वाची योजना असणे, मात्र आजवर शोभिवंत माशांचे उत्पादन घेणाऱ्या मत्स्योत्पादकांना याचे लाभ न मिळणे, या मत्सोत्पादकांसाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजने अंतर्गत कोणतीही योजना नसणे, पश्चिम बंगाल मधुन मोठ्या प्रमाणावर शोभिवंत मासे महाराष्ट्रातील बाजारपेठांमध्ये येणे, महाराष्ट्रातील मत्स्योत्पादकांना शासनाकडून आर्थिक साहाय्य न मिळणे, परिणामी महाराष्ट्रातील शोभिवंत माशांचे उत्पादक यांच्यामध्ये निर्माण झालेली चिड, असंतोष व सरकार बद्दलची नाराजीची भावना, शोभिवंत माशांच्या उत्पादकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने सरकारने प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०५, मत्स्यव्यवसाय**<br>**बाब क्रमांक: ६०, रूपये:- ६२,५५,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (९) | ७३५ | १० | दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियमनानुसार अनधिकृत मासेमारीला पायबंद घालण्याचा तत्कालिन सरकारने केलेला असणे, एलईडी, पर्ससीन सारख्या धोकादायक मासेमारीमुळे पारंपरिक मच्छीमारांवर संकट आलेलं असणे, पर्ससीन व एलईडी मासेमारीमुळे समुद्रात मत्स्यदुष्काळ निर्माण होणे, मासेमारी अधिनियमाचे पालन न होणे, सागरी किनारपट्टीवर गस्तीनौकांचा अभाव असणे, आवश्यक संख्येने गस्तीनौका उपलब्ध नसणे, परिणामी अनधिकृत मासेमारी करणाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा धाक नसणे, गस्तीनौकांची संख्या व सुरक्षारक्षकांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-९**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४४०५, मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ६१, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१०) | ७३४ | १० | मालाड पश्चिम येथील भाटी गावातील बहुतांश लोक मासेमारी करुन आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असणे. मासेमारी करुन आणलेली मासळी आपापल्या खल्यावर सुकवुन मासेमारी व्यवसाय करीत असणे, समुद्राच्या मोठ्या भरतीमुळे व पावसाळी वादळ वाऱ्यामुळे ग्रामस्थांची भाटी गावाच्या बंदरा लगत वडिलोपार्जित असलेली खली नेस्ताबुत होणे, खली लवकरात लवकर बनवुन देण्याच्या दृष्टीने, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ४ जुलै, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई